महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१
दूरध्वनी क्र: ०२२-२२०१३५७८ Email ID : soyojana११.rdd-mh@nic.in

---

क्रमांक-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२/यो-११ दिनांक :- ०८ जानेवारी, २०२६

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,(सर्व)

**विषय- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत क्षेत्रभेटी व साप्ताहिक मार्गदर्शक पुस्तिकेबाबत.**
**संदर्भ- शासनाचे समक्रमांकित पत्र दि.२६.१२.२०२५.**

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

०२. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या क्षेत्र (गाव) भेटींची संख्या, छायाचित्रे व व्हिडिओ लिंक यांची माहिती Google Form मध्ये नियमित भरण्याच्या सूचना संदर्भाधिन पत्राद्वारे देण्यात आल्या होत्या. **आता "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत गाव भेटींचा साप्ताहिक अहवाल Google Form लिंकद्वारे न भरता, थेट अभियानाच्या अधिकृत Website (https://cmsprardd.maharashtra.gov.in/) वर उपलब्ध (CEO / BDO) Login द्वारे भरणे बंधनकारक राहील.**

०३. या संबंधित सविस्तर साप्ताहिक मार्गदर्शक पुस्तिका (CEO / BDO Form User Manual) या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी सदर सूचनांनुसार तात्काळ कार्यवाही करावी.

आपला,

(सुभाष इंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत:- निवडनस्ती यो-११.

# मार्गदर्शक पुस्तिका

**साप्ताहिक भेट – गावनिहाय कार्यक्रम माहिती फॉर्म**

# अनुक्रमणिका


**1.फॉर्मचा उद्देश** ....................................................2

**2. फॉर्म कोणी भरावा** ....................................................5

**3. फॉर्ममधील घटकांचे स्पष्टीकरण**....................................................6

- ☐ आठवडा निवडा ....................................................6
- ☐ तालुक्याची नावे / ग्रामपंचायत निवडा ....................................................6
- ☐ आठवड्यात भेट दिलेल्या गावांची संख्या....................................................6
- ☐ छायाचित्रे अपलोड करताना....................................................6
- ☐ लिंक नमूद ....................................................6

**4. छायाचित्र अपलोड करण्याबाबत सूचना (अत्यंत महत्त्वाचे)**....................................................6

**5. माहिती सादर करण्याची पद्धत (Step-by-Step)**....................................................7

**6. महत्त्वाच्या अटी व शर्ती**....................................................7

**7. तांत्रिक अडचणी असल्यास**....................................................8

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान

## मार्गदर्शक पुस्तिका

## साप्ताहिक भेट – गावनिहाय कार्यक्रम माहिती फॉर्म

## (CEO Form / BDO Form)

### 1.फॉर्मचा उद्देश

या फॉर्मचा उपयोग **आठवड्यानुसार गावभेटीदरम्यान राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती**, संबंधित छायाचित्रांसह ऑनलाइन सादर करण्यासाठी करण्यात येतो.


आपल्या इंटरनेट ब्राउझरमध्ये खालील संकेतस्थळ उघडा:

☞ https://cmsprardd.maharashtra.gov.in/`

**STEP 1: मुख्यपृष्ठावरील "ऑनलाईन अर्ज करा" या पर्यायावर क्लिक करा.**



**STEP 2: पुढे जा** या बटणावर क्लिक केल्यानंतर कंट्रोल लॉगिन पेज वर जाईल





**STEP 3: लॉगिन पेजवर आल्यानंतर**




वापरकर्तानाव व पासवर्ड भरून झाल्यावर, दिलेला **कॅप्चा (Captcha)** भरा.

शेवटी **'लॉगिन'** या बटणावर क्लिक करा.

**STEP 3**: लॉग इन केल्यानंतर-Home Page वरील डाव्या बाजूस असलेल्या **साप्ताहिक'अहवाल'** या पर्यायावर क्लिक करावे.




**STEP 4: फाईल पेज अद्यावत करताना खालील माहिती भरणे आवश्यक आहे**





## 2. फॉर्म कोणी भरावा

- **CEO Form** : जिल्हा स्तरावरून माहिती सादर करण्यासाठी
- **BDO Form** : तालुका / पंचायत समिती स्तरावरून माहिती सादर करण्यासाठी

**BDO login Screen**




**CEO login Screen**




## 3. फॉर्ममधील घटकांचे स्पष्टीकरण

**(A) आवश्यक माहिती**

- आठवडा निवडा
  - ड्रॉपडाऊनमधून संबंधित आठवडा निवडावा.
- तालुक्याची नावे / ग्रामपंचायत निवडा
  - Multiple Selection पर्याय उपलब्ध आहे.
  - आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक पर्याय निवडता येतील.
- आठवड्यात भेट दिलेल्या गावांची संख्या
  - केवळ संख्यात्मक (Numeric) माहिती नमूद करावी.
- छायाचित्रे अपलोड करताना

  गावभेटीची छायाचित्रे अपलोड करताना, अपलोड करण्यात येणारी छायाचित्रे जिओ-टॅगिंग (Geo-Tagging) केलेली असणे आवश्यक आहे.
- लिंक नमूद

  Google Drive / Video / Social Media Link असल्यास नमूद करावा.

## 4. छायाचित्र अपलोड करण्याबाबत सूचना (अत्यंत महत्त्वाचे)

**टीप 1 :**

- प्रत्येक बीडीओ यांनी आठवड्याभरात किमान १० गावांना, तसेच सीईओ यांनी किमान ५ गावांना भेट देणे अपेक्षित आहे. त्यानुसार प्रत्येक गावाचे स्वतंत्र एक छायाचित्र घेऊन, सर्व गावांची छायाचित्रे एकत्रित करून एकाच PDF स्वरूपात रूपांतरित करावीत.( गावभेटीची छायाचित्रे अपलोड करताना, अपलोड करण्यात येणारी छायाचित्रे जिओ-टॅगिंग (Geo-Tagging) केलेली असणे आवश्यक आहे.)

**टीप 2 :**

- एका गावासाठी **एकापेक्षा अधिक छायाचित्रे असल्यास**,ती **एकाच PDF फाईलमध्ये** करून अपलोड करावीत.
- **अपलोड फाईल साईज : कमाल 15 MB**
- JPG फाईल्सपासून PDF तयार करण्याबाबत मार्गदर्शक व्हिडिओ

  https://www.youtube.com/watch?v=-jUOjrMsaP8

**टीप 3 : छायाचित्र अपलोड करण्याचा क्रम (अनिवार्य)**

- प्रथम गावाचे नाव व ठिकाण नमूद करावे.
- त्यानंतर संबंधित गावाची छायाचित्रे घ्यावीत.
- त्यानंतर छायाचित्रांची फाईल अपलोड करावी.

---

## 5. माहिती सादर करण्याची पद्धत (Step-by-Step)

* सर्व आवश्यक फील्डमध्ये योग्य माहिती भरा.
* छायाचित्रे दिलेल्या सूचनांनुसार अपलोड करा.
* आवश्यक असल्यास लिंक टाका.
* सर्व माहिती तपासून **“माहिती भरा”** या बटणावर क्लिक करा.
* माहिती यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर पुढील दुरुस्ती करता येणार नाही.

---

## 6. महत्त्वाच्या अटी व शर्ती

- पहिल्या आठवड्याचा साप्ताहिक अहवाल यशस्वीरीत्या सादर केल्याशिवाय पुढील आठवड्याचा अहवाल भरणे शक्य होणार नाही.
- एकदा सादर करण्यात आलेला अहवाल कोणत्याही परिस्थितीत बदलता किंवा दुरुस्त करता येणार नाहीत्यामुळे सर्व . संबंधित अधिकारी यांनी अहवाल सादर करण्यापूर्वीसर्व माहिती काळजीपूर्वक व अचूकरीत्या भरावी, अशी विनंती आहे.
- चुकीची, अपूर्ण अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास संबंधित अहवाल अमान्य ठरविण्यात येईल व त्याची जबाबदारी संबंधित अधिकारी यांची राहील.

## 7. तांत्रिक अडचणी असल्यास

- छायाचित्र अपलोड होत नसल्यास संबंधित PDF फाईलची साईज विहित मर्यादेत (कमाल 15 MB) आहे की नाही, याची खात्री करावी.
- PDF फाईल तयार करताना छायाचित्रे स्पष्ट, वाचनीय व योग्य प्रकाशात घेतलेली असावीत, याची दक्षता घ्यावी.
- इंटरनेट कनेक्टिव्हिटी योग्य असल्याची खात्री करून पुनः प्रयत्न करावा.
- वरील उपाय करूनही समस्या कायम असल्यास, संबंधित तांत्रिक सहाय्य पथक / प्रणाली व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा.

तांत्रिक सहाय्यासाठी संपर्क (Technical Support)


• देवेंद्र पाटील – 7066505650

• जयश्री माळी – 7841878555

• सुमित वाघधरे – 9029876488

ई-मेल आयडी: cmspra.info@gmail.com